# नियमित फौजदारी खटला क्रमांक ११६/२०२५ मधील निशाणी क्रमांक १३ खालील आदेश

## (CNRNO-MHRT080005862025)

अभियोगपक्षातर्फे प्रस्तुतचा अर्ज संबंधीत तपासीक अधिकारी यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी म.पो.शि. कु. रुपाली सुंदर कुरणे यांनी काढलेली छायाचित्रे व भारतीय साक्ष अधिनियमाचे कलम ६३(४)क अन्वयेचे प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी आदेश होणेबाबत दाखल केला आहे.

०२. आरोपीतर्फे सदर अर्जावर आक्षेप घेण्यात आला आहे की, आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी त्यांना पुरेसा अवधी होता. आरोपीचा बचाव उघड झाला आहे. फिर्यादी व साक्षीदारांनी आरोपीच्या बाजुने महत्वाच्या बाबी मान्य केल्या आहेत. त्या पुसण्यासाठी मागावुन खोटा पुरावा तयार करुन सदरचा अर्ज दाखल केला जात आहे. आरोपीच्या नैसर्गिक बचावावर याचा विपरीत परीणाम होणार आहे. पुराव्यातील उणीवा भरुन काढण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज असल्याने तो फेटाळण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

०३. दोन्ही बाजुंना ऐकले. अभिलेख पाहिले.

०४. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे एकुण ०२ साक्षीदारांना तपासण्यात आले आहे. पैकी साक्षीदार क्रमांक ०२ यांचा उर्वरीत सरतपास पुर्ण झालेला नाही. दोषारोपपत्रामध्ये म.पो.शि. कु. रुपाली सुंदर कुरणे यांचे कलम ६३(४)क अन्वये, प्रमाणपत्र व त्यासोबत संबंधीत व्हीडीओचे पुर्ण तपशील देण्यात आले आहेत. सदरची बाब घटनास्थळ पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आली आहे. तसेच सदर घटनास्थळ पंचनाम्यामध्ये ई-साक्ष ॲपद्वारे मोबाईलमध्ये पंचनाम्याचे

व्हीडीओ शुटींग व फोटोग्राफी करण्यात आल्याचे नमुद करण्यात आले आहे. दोषारोपपत्रसोबत म.पो.शि. कु. रुपाली सुंदर कुरणे यांचे इंग्रजी भाषेतील प्रमाणपत्र फेरिस्तमध्ये अनुक्रमांक ०७ कडे अभिलेखावर याआधीच दाखल आहे. त्यामुळे, त्याबाबतीत वेगळा आदेश करणे गरजेचे नाही.

**०५**. साक्षीदार क्र. ०२ क्रमांक यांचा उलटतपास अद्याप सुरु झालेला नाही. त्यामुळे, छायाचित्रे अभिलेखावर दाखल करण्यासाठी आदेश केल्यास आरोपीला उलटतपासादरम्यान सदर छायाचित्रांबाबत उत्तर सुचक प्रश्ने विचारण्याची व अभियोगपक्षाचा पुरावा खोडुन काढण्याची पुर्णपणे संधी मिळणार आहे. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीकोनातुन सदरचा अर्ज मंजुर करणे गरजेचे वाटते. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे –

**<u>आदेश</u>**

**१**. अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२**. म.पो.शि. कु. रुपाली सुंदर कुरणे यांनी घेतलेली दिनांक ३०/१०/२०२५ रोजीचे छायाचित्रे अभिलेखावर दाखल करण्यासाठी संबंधीत तपासीक अधिकारी यांना पत्र पाठविण्यात यावे.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.21 18:16:42 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक २१/०२/२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग – १ देवरुख,**

**देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

-: **C E R T I F I C A T E** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order/Judgment .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | The Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate F.C., Deorukh. |
| Date of Decision | : | 21/02/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 21/02/2026 |
| Order uploaded on | : | 21/02/2026 |